Vol-13 Special Issue- 1.2 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# 'वसुधैव कुटुंबकम' संकल्पनेमधील मुख्य अडसर : दहशतवाद व उच्चशिक्षणाच्या माध्यमातून त्यावरील उपाययोजना

**डॉ. सौ. अल्फा प्रशान्त रोकडे जैन**
दिग्रस, जि. यवतमाळ

## प्रास्ताविक

भारत आज 'विकसनशील राष्ट्रांच्या गटात मोडतो. इ.स. 2047 पर्यंत आपला देश 'विकसीत राष्ट्र' या श्रेणीत गणला जावा, असे लक्ष्य आपण निश्चित केले आहे. हे लक्ष्य गाठण्याच्या वाटचालीत अनेक अडथळे येणार आहेत. त्यासर्व अडसरांवर मात करूनच विकसित भारताचे स्वप्न साकार होऊ शकते. मात्र हे सर्व अडथळे पार पाडण्यासाठी काही कठोर पाऊले उचलावी लागतील. विकासाच्या वेगाला अवरुध्द करू पाहणाऱ्या सर्व अडथळ्यांना मोडून काढावे लागेल. या वाटेवरील अनेक गतीरोधकांपैकी घातक गतीरोधक म्हणजे दहशतवाद होय. कोणत्याही राष्ट्राची प्रगती होण्यासाठी त्या राष्ट्रात शांतता नांदणे आवश्यक असते. शांतता टिकविण्यासाठी कायदा व सुव्यवस्था कायम राखण्याची गरज असते. परंतु कायदा, सुव्यवस्था व शांतता यांना मारक ठरणारा एक मोठा घटक म्हणजे दहशतवाद होयः दहशतवादावर नियंत्रण मिळविल्या शिवाय विकसीत भारताचे स्वप्न साकार होणे अवघड ठरेल. यास्तव, दहशतवादाच्या कारणांचा शोध घेऊन त्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पाऊले उचलावी लागतील. केवळ वरवरचे उपाय न करता मने घडवावी लागतात. दहशतवादी मानसिकतेचे निर्मूलन केवळ 'वसुधैव कुटुंबकम' या भावनेच्या आधारेच शक्य आहे. सहिष्णूता, मानवता, पर मताचा आदर, इ. यासारख्या गुणांचा समुच्चय मानव समाजात झाला तरच 'वसुधैवकुटुंबकम' भावनेचा आविष्कार होईल. यासाठी वरील गुणांचे संक्रमण मानव समाजात होणे गरजेचे आहे. ही भावना, प्रबळ झाल्यास दरहशतवादाला लगाम घालणे शक्य होईल. यासाठी उच्चशिक्षणाच्या अभ्यासक्रमात आवश्यक ते बदल करावे लागतील. काही घटक नव्याने समाविष्ट करावे लागतील हे बदल उच्च शिक्षणाच्या माध्यमातूनच का करावे? याचे उत्तर म्हणजे आज दहशतवादी विचारांचे आकर्षण विशेषकरून तरुणांना आणि त्यातही महाविद्यालयीन सुशिक्षित तरुणांना अधिक वाटत आहे असे दिसून येते. या मानसिकतेतून त्यांना बाहेर काढण्यासाठी उच्च शिक्षण हे प्रभावी माध्यम ठरु शकते.

## 'वसुधैवकुटुंबकम' संकल्पना

वसुधैवकुटुंबकम हा संस्कृतमधील वाक्प्रचार आहे. या संज्ञेचा अर्थ 'संपूर्ण विश्व एक कुटुंब आहे, असा होतो. हे वाक्य सार्वत्रिक बंधुत्वाच्या भावनेवर आधारीत आहे. मानवतेच्या परस्पर संबंधावर प्रकाश टाकणारी ही संकल्पना आहे. आपण या जागतिक कुटुंबाचे एक असे घटक आहोत ज्यात राष्ट्र, वंश, भाषा, वर्ण, जात, प्रांत यासारख्या भेदांच्या वर उठून जागतिक बंधुत्वाचा विचार करावा लागतो. या मानसिक ठेवणीचा अविष्कार म्हणजे ही कल्पना होय. 'वसुधैवकुटुंबकम' चा उल्लेख सर्वप्रथम प्राचीन भारतीय ग्रंथांमध्ये सापडतो. महोपनिषद' या उपनिषद ग्रंथात 'वसुधा' म्हणजे पृथ्वी एवं', म्हणजे ही आणि 'कुटुंबकम' म्हणजे कुटुंब आहे. हे वाक्य स्वतःमध्ये परिपूर्ण नसून श्लोकातील केवळ एक ओळ आहे. पूर्ण श्लोक असा - अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम् । उदारचरितानां तू वसुधैवकुटुंबकम ।।( महोपनिषद अध्याय 4-श्लोक 71)

**श्लोकाचा शब्दशः** अर्थ- हा आपला बंधू आहे व हा आपला बंधु नाही असा विचार केवळ कोत्या मनाचे लोक करतात. जे विशाल हृदयी, मोठ्या मनाचे असतात ते संपूर्ण विश्वालाच आपले कुटुंब मानतात.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

### दहशतवाद संकल्पना

दहशतवाद एक अत्यंत गुंतागुंतीची संकल्पना आहे. सर्वसामान्यपणे आपल्या मागण्या किंवा उद्दिष्ट जोर-जबरदस्तीनी मान्य करून घेण्यासाठी एखाद्या विशेष समूहात अन्यंतिक भिती निर्माण करण्याच्या हेतूने एखादी व्यक्ति किंवा गट यांनी चालीवलेला हिंसाचार ह्यात गृहीत आहे. धमकी देणे, बळजबरी करणे, हिंसा करणे, इ. बाबी यात अभिप्रेत आहेतः जागतिक स्तरावर दहशतवादीची कोणतीही एक सर्वमान्य व्याख्या नाही. तरीरी जगभरातील विविध विचारवंतांनी आपापल्या दृष्टीकोनातून व्याख्या केलेल्या दिसून येतात. निवडक तज्ञांच्या व्याख्या पुढील प्रमाणे.

### वॉल्टर लॅकेअर (Walter Laquer)

'राजकीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शक्तीचा किंवा हिंसेचा केला जाणारा वापर' म्हणजे दहशतवाद असे यांचे मत आहे. त्यांच्या मते दस्शतवाद ही गुन्हेगारी नसून राजकीय हेतूने प्रेरीत होते.

### ब्रुस हॉफमन (Bruce Haffman)

राजकीय बदल घडवून आणण्यासाठी किंवा त्याकडे लक्ष वेधण्यासाठी जाणीवपूर्वक केलेली हिंसेची कृती 'म्हणजे दहशतवाद.

### अलेक्स श्मिड (Alex Schmid)

यांच्यामते दहशतवाद ही एक अशी हिंसक पध्दती आहे, ज्यात बळी पडलेले लोक हे मुख्य लक्ष्य नसून, त्यांच्याद्वारे समाजातील इतर लोकांमध्ये भिती निर्माण करणे होय.

### दहशतवादाचे परिणाम

आज जगभर दहशतवादाने थैमान घातलेले दिसत आहे. याचे दुष्परिणाम जेवढे गंभीर आहेत, तेवढेच ते विनाशकारी आहेत, तसेच अत्यंत दूरगामी सुध्दा आहेत. त्याचे परिणामी सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक, मानसिक, इ. क्षेत्रे ढवळून निघत आहेत. काही प्रमुख दुष्परिणाम पुढील प्रमाणे सांगता येतील-

### मानवी हक्कांचे हनन

मानवाचे हक्क व त्यांचे वैयक्तिक स्वातंत्र्य यावर दहशतवादी कृत्ये थेट परिणाम करीत आहेत. जे बळी पडतात त्यांचा जणू जिविताचा हक्कच नाकारल्या जात आहे. परिणामी मानवाच्या स्वच्छंद जगण्यावर मर्यादा येत अधिकारांचे उल्लंघन हा मोठा परिणाम मानावा लागेल.

### सामाजिक अस्थिरतेला निमंत्रण

एखादा समाज जेव्हा दहशतवादाच्या सावटाखाली वावरतो तेव्हा परस्पर अविश्वासाची भावना बळकट होऊन सामाजिक वीण विस्कटते. सामाजिक सलोखा बिघडतो. पिडीतांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढीस लागते. समाज कमकुवत होतो.

### निष्पाप लोकांचा बळी

दहशतवादी जेव्हा हिंसक हल्ले चढवितात तेव्हा सर्वसामान्य लोक नाहक बळी पडतात मोठ्या प्रमाणात जिवित हानी होते.

### स्थलांतराची समस्या

एखाद्या विशेष प्रदेशात जेव्हा दहशतवादी वारंवार कत्तलीचा व अत्याचाराचा हैदोस घालतात तेव्हा लोकांचा जीव व अब्रु वाचविण्यासाठी आपली मालमत्ता सोडून पलायन करावे लागते त्यातून निर्वासितांचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. हे निर्वासित ज्याप्रदेशात येऊन राहतात तेथील स्थानिक जनतेसोबत त्यांचे कलह निर्माण होतात.

### शांतता व सुव्यवस्था धोक्यात

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

कायद्याचा आदर व कायद्याचा धाक ही कोणत्याही राज्याची प्राथमिक गरज आहे. त्याने शांतता व सुव्यवस्था नांदू शकते. सतत दहशतवादी कृत्ये होत राहिल्यास कायदा व नियमानुसार राज्य चालविणे कठीण जातेः

## आर्थिक विकासाला अवरोध

राज्यात शांतता व सुव्यवस्था असली तरच प्रगतीसाठी पोषक वातावरण निर्माण होते. मात्र सततच्या हिंसात्मक घटना विकासाला अडसर ठरतातः उद्योगधंदे, व्यवसाय, रोजगार, इत्यादिवर वर विपरीत परिणाम होतात. परिणामी गरीबी, दारिद्रय यांना निमंत्रण मिळते. दहशतवादी कारवायांमुळे विदेशी गुंतवणूक येत नाही. परिणामी परकीय चलनाचा साठा घटतो, पर्यटन उद्योगाची हानी होते.., शेअरबाजारावर विपरीत परिणाम होतो. आरोग्यसेवेवर सुद्धा ताण पडतो. असे हल्ले रोखून धरण्यासाठी किंवा परतवून लावण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो स्वाभाविकच आर्थिक स्थैर्य ढासळते.

## मानसिक आघात

एखादा समाज जेव्हा अविरत भिती-खाली वावरत असेल तेव्हा मानसिक आरोग्याच्या समस्या वाढतात. समाजात नैराश्य येऊन मानसिक संतुलन ढळण्याची शक्यता वाटते. मानवी संवेदना बोथट होतात व त्यातून उन्मादी मानसिकता वाढीस लागले. ही एक प्रकारची मनोवृत्तीच असे. त्यातून मानवतावादी विचारांचे स्खलन होते.

## कट्टर विचारांचा प्रभाव

सततच्या हिंसक घटनांमुळे कट्टरतेच्या विचारसरणीला उत्तेजन मिळते. इतर समाज घटकांबद्दल द्वेषभावना वाढीस लागले. कट्टर वादाचा प्रभाव वाढल्याने लोकांचा हिंसकवृत्तीकडे कल वाढीस लागतो.

## लोकशाहीवरील विश्वासाला तडे

जगभरातील शासनपध्दती पैकी लोकशाही ही सर्वश्रेष्ठ शासनपद्धती मानावी लागते. सातत्याने दहशतीच्या सावटाखाली वावरण्याने प्रचलित सरकार आपल्यावरील अन्यायाचे निरसन करू शकत नाहि अशी भावना समाजात बळावते, हळूहळू लोकशाहीवरील विश्वास कमी होऊन लोकशाही संस्था कुचकामी वाटू लागतात.

## दहशतवाद निर्मूलनातील प्रमुख अडचण

दहशतवादाचे समूळ उच्चाटन शक्य नारी परंतु त्यांची संख्या व तीव्रता कमी करण्याचे प्रयत्न करावे लागतील. या प्रयत्नातील प्रमुख अडसर पुढीलप्रमाणे -

## परिपूर्ण व स्पष्ट व्याख्येचा अभाव

दहशतवादांचा नेमका अर्थ काय? याविषयी अजूनही जगात एकमत नाही संपूर्ण जगाला मान्य होईल अशी एक निश्चित व्याख्या नाही. प्रत्येक देश, समाजघटक, व्यक्ती दहशतवादाची स्वमताप्रमाणे वेगवेगळी व्याख्या करीत आहे. परिणामी एखादी कृती, एकाला दहशतवादीकृती वाटले तर दुसऱ्याला तीच कृती स्वातंत्र्यासाठी दिलेला लढा वाटतो. अजून एखादे हिंसककृत्य घडल्यास एकाला ते धार्मिक वर्चस्वासाठी केल्या गेलेले कृत्य वाटते तर दुसऱ्याला धर्माच्या रक्षणासाठी केल्या गेलेली कृती वाटते. एकसूरी व्याख्येचा अभाव दहशतवाद निर्मूलनातील प्रमुख अडसर आहे.

## दुहेरी मापदंड

जगभरात कितीतरी दहशतवादी संघटना अस्तित्वात आहेत परंतु अशा संघटनांच्या बाबतीत जगभरातील देशांची भूमिका समान नाही. कारण दहशतवादी व त्यांच्या संघटना याबाबतीत बरेच देश दुहेरी मापदंड लावताना दिसतात. पश्चिम आशियातील काही दहशतवादी संघटनांना अद्यापही अनेक देशांनी 'दहशतवादी संघटना' घोषीत केले नाही. जर एखाद्या संघटनेचा मला त्रास होत नसेल तर मी त्याविरुद्ध भूमिका का घ्यावी? अशी मानसिकता त्यामागे आहे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## राजसत्तेचे समर्थन

बरेचदा दहशतवादी व्यक्ती, संघटना किंवा त्यांचे हिंसक हल्ले यांना देशातील राजसत्तेचे समर्थन प्राप्त असते. अशा देशातील राजसत्ता शत्रूराष्ट्रांच्या विरुध्द किंवा आपल्याच देशातील विरोधकांच्या विरुध्द दरशतवादाला खतपाणी घालीत असतात. आपली राजकीय सत्ता, लष्करी सामर्थ्य व आर्थिक पाठबळ दहशतवाद्यांना मिळत असल्यामुळे त्यांच्या
कारवाया मोडून काढणे अवघड होऊन बसते याची सर्वाधिक प्रचिती भारताला येत आहे.

## विकृत मानसिकता

दहशतवाद्यांचे बेगडी समर्थन करणाऱ्यांनी काही क्लृप्त्या शोधून काढलेल्या आहेत, त्यापैकीच एक क्लृप्ती म्हणजे 'चांगला दहशतवाद व वाईट दहशतवाद' होय. यागोष्टीचा भ्रामक प्रचार करून ते हिंसक कृत्यांना उत्तेजनच देत असतात. याविकृत मानसिकतेचे अजून एक उदाहरण म्हणजे दहशतवाद्यांच्या मानवाधिकारांचे समर्थन करणे होय. जे दहशतवादी आहे त्यांनाही काही मौलिक हक्क आहे व त्या हक्कांचे जतन झाले पाहिजे असा फोल दावा काही लोक करतात, असा दावा करताना हे लोक विसरतात की याच दहशतवाद्यांनी ज्या निष्पाप लोकांच्या कत्तली केल्या त्या लोकांनाही जिविताचा हक्क होता. या हक्काबद्दल हे लोक मौन बाळगतात.

## उच्चशिक्षणाच्या माध्यमातून करावयाच्या उपाय योजना –

दहशतवाद व हिंसाचार यांची कारणे व परिणाम ह्याबद्दल विद्यार्थ्यांना व सामान्य जनतेलाही माहिती व्हावी व त्यामुळे त्यांच्यात जागृती निर्माण व्हावी ह्यासाठी विद्यापीठ व महाविद्यालयांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. काही प्रमुख उपाय-योजना पुढील प्रमाणे सांगता येतील.

## अभ्यासक्रमातील फेरबदल -

दहशतवादी विचारसरणीला परावृत्त करण्यासाठी अभ्यासक्रमात आवश्यक ते बदल करावे लागतील जसे.

नवीन घटकांचा समावेश – उच्चशिक्षण व्यवस्थेत काही नवीन घटक अंतर्भूत करावे लागतील. ज्यामाध्यमातून दहशतवादाचे गांभीर्य विद्यार्थ्यांना पटवून देऊन त्यांची मने घडवावी लागतील.

स्वतंत्र विषयाची मांडणी : आज दहशतवादाचा सर्व पैलूंनी सखोल अभ्यास करण्याची गरज आहे. त्यामुळे केवळ एखादा घटक अंतर्भूत करून कदाचित भागणार नाही. दहशतवादाचा अर्थ, त्याची कारणे, त्यातील घटनाक्रम, त्याचे परिणाम यासर्व गोष्टींचे समग्र आकलन होण्यासाठी एक स्वतंत्र विषयाची मांडणी करून दहशतवादाचा अभ्यास करावा लागेल.

राष्ट्रीय आस्मतेला विश्वबंधुत्वाची जोड - राष्ट्रीय अस्मिता व वसुधैवकुटुंबकम या दोन परस्पर विरोधी विचारसरणी नाहीत तर त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, अशी शिकवण देण्याची उच्चशिक्षणाच्या अभ्यासक्रमात आवश्यक त्याबाबींचा अंतर्भाव करावा लागेल हे दोन्ही विचार हातातहात घालून चालू शकतात असा संदेश द्यावा लागेल.

## अभ्यासेत्तर उपक्रमांचे आयोजन -

अभ्यासक्रमातील फेरबदला सोबतच अभ्यासेत्तर उपक्रमांची फेरमांडणी करावी लागेल जसे -

मेळाव्यांचे आयोजन - विद्यापीठांनी आपल्या कार्यक्षेत्राच्या बाहेर जाऊन सामान्य जनतेसाठी मेळावे घ्यावे व त्यातून दहशतवाद विरोधास आवश्यक असणारी सर्व माहिती त्यांना द्यावी.

पिडितांचे अनुभव कथन - दहशतवादी हल्ल्यातील पिडीत लोकांचे अनुभव विद्यार्थ्यांना माहिती व्हावे यासाठी कार्यक्रम आयोजित करावे. त्यांच्या वेदना व दुःख विद्यार्थ्यांना कळल्या तर पिडीतांविषयी अनुकंपा व दहशतवाद्यांविषयी घृणाभाव निर्माण होण्यास मदत होईल.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

'विश्वसौहार्द' दिंडीचे आयोजन - सहिष्णूता व बंधुत्व या मानवतावादी विचारांची विद्यार्थ्यांमध्ये पेरणी करण्यासाठी थोरसंतांच्या पुण्यतिथी अथवा जयंतीच्या दिवशी अशा दिंडीचे आयोजन करावे.

मानसिक आरोग्य शिबीराचे आयोजन - दहशतवादाच्या परिणामी लोकांचे मानसिक संतुलन ढळते. यावर उपाय म्हणून विद्यापीठ / महाविद्यालय स्तरावर अशी शिबीरे घ्यावी.

धाडसी लोकांचा सत्कार - एखाद्या दहशतवादी हल्ल्याच्या प्रसंगी ज्यांनी धाडस दाखवून प्रतिकार केला अशांचा सत्कार विद्यार्थ्यांसमोर करण्यात यावा. यामाध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जिद्द व साहस निर्माण होण्यास मदत होईल.

निर्वासितांच्या शिबीरांना भेटी - दुःखाने खचलेल्या पिडीतांचे दुःख जाणून घेण्यामुळे विद्यार्थ्यांच्या संवेदना जागृत होतील.

## अभ्यास्पूरक कार्यक्रम

अभ्यासेत्तर कार्यक्रमांशिवाय वर्गखोलीतील अध्यापनाला जोड दिना काहीतरी अभ्यासपूरक कार्यक्रम घेतले जातात. जसे - विद्यापीठ / महाविद्यालयीन पातळीवर गटचर्चा स्पर्धा, प्रश्नमंजुषा, वक्तृत्व, वादविवाद, निबंध, पोस्टर्स, क्रिडा स्पर्धा इत्यादींचे आयोजन करून त्यामाध्यमातून दहशतवादाच्या संदर्भातील विविध दृष्टीकोनांवर प्रकाश टाकण्यात यावा. क्रिडास्पर्धांच्या माध्यमातून खेळभावना व बंधूभाव वाढीस लागतो.

दहशतवाद विरोधी प्रतिज्ञा - शैक्षणिक सत्रात वेळोवेळी अशा अर्थाची प्रतिज्ञा विद्यार्थ्यांकडून वदवून घ्यावी.

इतर उपक्रम - विद्यार्थ्यांसाठी सेमीनार, परिसंवाद, कृतीसत्र, चर्चासत्र परिषदा, NSS/NCC युनिट यांची नव्याने ध्येय निश्चिती करण्यासाठी, इत्यादींचे आयोजन करून दहशतवाद विरोधक विचारांचे संक्रमण विद्यार्थ्यांमध्ये करण्यात यावे.

## प्राध्यापकांसाठी प्रशिक्षणवर्ग -

महाविद्यालयीन व विद्यापीठ प्राध्यापकांसाठी मार्गदर्शन शिबीर आयोजन करून दहशतवादाच्या संदर्भात आवश्यक ती माहिती द्यावी.

## आणीबाणीच्या वेळेसची खबरदारी

अचानक दहशतवाद हल्ला झाल्यास भांबावून नजाता, सामोरे जाण्या अशा अवघड प्रसंगी काय करावे व काय करू नये याची नेमकी माहिती विद्यार्थ्यांना असणे आवश्यक आहे. कोणकोणत्या प्रकारची खबरदारी घेणे आवश्यक आहे याचे ज्ञान विद्यार्थ्यांना व नागरिकांना असावी, ज्यामुळे स्वतःची कमीत-कमी हानी होईल त्यादृष्टीने दक्ष राहू शकतात. केवळ माहिती देणे पुरेसे ठरणार नाही तर त्याचे प्रशिक्षणही द्यावे लागेल. मॉकड्रील सारखे प्रयोगही करावे लागतील.

## संदर्भसूची

मराठी विश्वकोष खंड -7
प्रमुख संपादक - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ,
मुंबई 1977 व खंड - 2 (1976)
धर्म के दशलक्षण - डॉ हुकुमचंद भारिल्ल प्रकाशक - रविन्द्र पाटनी ॲण्ड फॅमिली चॅरिटेबल ट्रस्ट
जागतिक समस्या- डॉ नारायण चौधरी, प्रा. व्यंकट कांबळे, प्राः निता साने, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
संकेतस्थळ - education.maharashtra.gov.in
PDF- https://www.education.gov.in